# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक ०५ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- पीएम किसान सन्मान निधीच्या माध्यमातून देशभरातल्या शेतकऱ्यांना आतापर्यंत सुमारे तीन लाख कोटी रुपयांची आर्थिक मदत
- संतोष देशमुख हत्या प्रकरणी पाच आरोपींना अटक; १८ जानेवारीपर्यंत सीआयडी कोठडी
- नांदेड शहरातल्या बहुचर्चित स्फोट प्रकरणात सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता
- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांना जर्मन भाषेचे धडे

  आणि

- बॉर्डर – गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात भारताचा दुसरा डाव १५७ धावांवर आटोपला, ऑस्ट्रेलियासमोर १६२ धावांचं लक्ष्य

****

पीएम किसान सन्मान निधीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सुमारे तीन लाख कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिल्लीत ग्रामीण भारत महोत्सव २०२५ चं उद्घाटन केलं, यावेळी त्यांनी ही माहिती दिली. गेल्या दहा वर्षात कृषी कर्जाच्या रकमेत साडे तीन पटीनं वाढ झाल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले...

***पी एम किसान सम्मान निधी से किसानों को करीब तीन लाख करोड रूपये की आर्थिक मदत दी गई है। पिछले दस वर्षों में कृषी लोन की राशी साढे तीन गुना हो गई है। अब पशु पालकों और मत्स्य पालकों को भी किसान क्रेडीड कार्ड दिया जा रहा है। देश मे मौजुद नौ हजार से ज्यादा एफ पी ओ, किसान उत्पाद संघ उन्हें भी आर्थिक मदत दी जा रही है।***

****

कृषी मालाच्या किंमतीतली तफावत दूर करण्यासाठी वाहतूक आणि साठवणूकीच्या किंमतीचा भार सरकार उचलणार आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी काल नवी दिल्लीत राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या कृषी मंत्र्यांच्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. यावर्षी कृषी आणि संबंधित क्षेत्रातला वाढीचा दर साडेतीन ते चार टक्क्यांदरम्यान राहणं अपेक्षित असल्याचं चौहान यांनी सांगितलं.

****

देशाच्या विज्ञान क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे भौतिक शास्त्रज्ञ डॉक्टर राजगोपाल चिदंबरम यांचं काल पहाटे मुंबईत वार्धक्यानं निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. केंद्र सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार, भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक, अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि अणु ऊर्जा विभागाचे केंद्रीय सचिव, अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या होत्या. चिदंबरम यांना पद्मश्री तसंच पद्मविभूषण या नागरी सन्मानानं गौरवण्यात आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर चिदंबरम यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

****

राज्यातल्या विविध नियोजन प्राधिकरणांचं सक्षमीकरण करुन त्यांचं कामकाज कंपनीच्या धर्तीवर करण्याच्या सूचना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. ते काल नगरविकास विभागाच्या बैठकीत बोलत होते. महिला आणि बालविकास विभागाच्या पुढील १०० दिवसात करायच्या कामांचाही मुख्यमंत्र्यांनी काल आढावा घेतला. राज्याच्या ग्रामीण भागासोबतच शहरी भागात विशेषत: मुंबई

महानगरात झोपडपट्टी परिसरात कुपोषण मुक्तीची मोहीम प्रभावीपणे राबवण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणांतले फरार आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे याना पुण्यातून तर सिध्दार्थ सोनवणे याला मुंबईतून अटक करण्यात आली आहे. या तीन आरोपींसह त्यांना सहकार्य करणारे डॉ.संभाजी वायबसे आणि त्यांची वकील पत्नी या दोघांना पोलिसांनी नांदेड इथून अटक केली होती, या सर्व आरोपींना केज न्यायालयात काल हजर करण्यात आलं, न्यायालयानं या सर्वांना १८ जानेवारीपर्यंत सीआयडी कोठडी सुनावल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे...

***नऊ डिसेंबरला संतोष देशमुख यांचं दिवसाढवळ्या अपहरण, अमानुष मारहाण आणि हत्या केल्यापासून फरार असलेल्या सुदर्शन घुलेसह सर्व आरोपींना पुढील तपासासाठी सीआयडी आणि एसआयटी पथकाच्या ताब्यात देण्यात आलं आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी ही माहिती दिली. या प्रकरणात चर्चेत असलेले बहुतांश प्रमुख आरोपी पकडले गेले आहेत, त्यामुळे आता विशेष तपास पथक तसंच सीआयडीकडून तपास पूर्ण होऊन आरोपपत्र दाखल होण्याची प्रतीक्षा आहे.***

***रवी उबाळे, आकाशवाणी बातम्यांसाठी, बीड***

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ परभणीत काल सर्वपक्षीय मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात, खासदार संजय जाधव, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार राहुल पाटील, आमदार राजेश विटेकर यांच्यासह दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख आणि शेकडो नागरिक सहभागी झाले होते.

****

नांदेड शहरातल्या बहुचर्चित स्फोट प्रकरणात न्यायालयाने सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. नांदेड शहरात पाटबंधारे नगरातल्या एका घरात सहा एप्रिल २००६ रोजी झालेल्या या स्फोट प्रकरणात काल तब्बल १८ वर्षांनंतर न्यायालयानं निकाल सुनावला. या प्रकरणातल्या १२ आरोपींपैकी दोन आरोपींचा स्फोटातच मृत्यू झाला होता. केंद्रीय अन्वेषण विभाग–सीबीआयने या प्रकरण दोन हजार पानांचं आरोपपत्र दाखल केलं होतं, मात्र हा बॉम्बस्फोट असल्याचं सिद्ध होऊ शकलं नाही. त्यामुळे हा फटाक्यांचा स्फोट असल्याचं ग्राह्य धरत न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या शाळेतले विद्यार्थी आता जर्मन भाषेत एबीसीडीचे धडे गिरवत आहेत. महापालिकेच्या प्रियदर्शनी शाळेने, मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत आणि उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली नव्या वर्षात हा उपक्रम सुरू केला आहे. जागतिक पातळीवर उच्च माध्यमिक शिक्षणाच्या व्यावसायिकीकरणाच्या दृष्टीने विद्यार्थी घडवणं हे या उपक्रमाचं मुख्य उद्दिष्ट असल्याचं, शाळेचे मुख्याध्यापक संजीव सोनार यांनी आकाशवाणीला सांगितलं. ते म्हणाले..

***जर आपल्या विद्यार्थ्यांना तिथे स्कोप पाहिजे असेल, तर त्यांना जर्मन भाषा येणं गरजेचं आहे. बेसिक जर्मन भाषा जर आपण मुलांना शिकवली तर मुलांना त्याच्यात आवड निर्माण होईल. आणि आवड निर्माण झाल्यानंतर ती मुलं निश्चित उच्च शिक्षण जर्मन भाषेतून घेतील म्हणून हा आमचा प्रयत्न आहे. या उपक्रमासाठी मागील तीन महिन्यांपूर्वी आमच्या शिक्षण विभागाकडून एक लिंक आली होती. जर जर्मन भाषा काही शिक्षकांना शिकायची असेल, तर ऑनलाईन ही शिकता येणार आहे. तर यासाठी जर्मनीमध्ये असलेले मिस्टर दावोस ऑनलाईन ट्रेनिंग घेतात. आमचे शिक्षक गेल्या तीन महिन्यांपासून ती भाषा शिकत आहेत. तेच शिक्षक आता शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवत आहेत.***

****

**क्रिकेट**

बॉर्डर – गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियासमोर १६२ धावांचं आव्हान दिलं आहे. सामन्याच्या आजच्या तिसऱ्या दिवसाच्या सुरुवातीलाच भारतीय संघाचा दुसरा डाव केवळ १५७ धावांवर आटोपला. या डावात ऋषभ पंतच्या ६० धावा वगळता कुणालाही मोठी धावसंख्या करता आली नाही. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या उपाहारापर्यंत तीन बाद ७१ धावा झाल्या होत्या..

****

लातूर इथं अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रदेशाच्या एकोणसाठाव्या तीन दिवसीय अधिवेशनाचा काल समारोप झाला. या अधिवेशनात शैक्षणिक सद्यस्थिती, सामाजिक सद्यस्थिती, स्वयंरोजगार आणि रोजगार निर्मिती तसंच उद्योजकता विकासाकडे युवकांची ओढ निर्माण करण्यासाठी सरकारने धोरण आखावं, असे प्रस्ताव संमत करण्यात आले. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' या विषयावर शिक्षण तज्ञ अनिल राव यांनी मार्गदर्शन केलं. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांची या सत्रास प्रमुख उपस्थिती होती.

****

भोपाळ इथं होत असलेल्या राष्ट्रीय विद्यापीठ मल्लखांब स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठचे खेळाडू काल रवाना झाले. या स्पर्धा आजपासून सुरु होत आहेत. शारिरीक शिक्षण विभागाचे संचालक भास्कर माने आणि नांदेड जिल्हा मल्लखांब संघाच्या कर्मचाऱ्यांनी यावेळी संघाला शुभेच्छा दिल्या.

****

नांदेड जिल्ह्यात माळेगाव यात्रेतल्या शासकीय कार्यक्रमांचा आज समारोप होत आहे. या यात्रेत कुस्त्यांची दंगल आज होणार असून, आठवडाभरात झालेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळाही होणार आहे. काल या स्पर्धेत नागरिकांनी शंकरपटाचा थरार अनुभवला. ५८ बैलजोड्यांनी या शर्यतीत भाग घेतला होता. त्यापैकी हिंगोली जिल्ह्याच्या औंढा तालुक्यात पिंपळदरी इथले महादू कोंडिबा रिटे यांच्या बैलजोडीने निर्धारित अंतर अवघ्या साडे चार सेकंदात पार करत पहिला क्रमांक पटकावला. परिसरातल्या गोरगरीब कुटुंबांमध्ये प्रसिद्ध असलेला जुन्या कपड्यांचा बाजार काल या यात्रेत आकर्षणाचं केंद्र होता.

****

वाहतूक नियमांचं पालन केल्यास अनेक लोकांचे प्राण वाचू शकतात, असं नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी म्हटलं आहे. ते काल हिंगोली इथं रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी यावेळी बोलताना, रस्ता सुरक्षा अभियानाशी निगडीत विविध कार्यशाळा, दुचाकी फेरी, नेत्र तपासणी शिबीरं तसंच, शाळा महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम राबवण्यात येत असल्याचं सांगितलं.

****

लातूर शहरात एका खाजगी रुग्णालयातले दिवंगत कर्मचारी बाळू डोंगरे यांच्या दोन्ही मुलांचा लातूर इथल्या केशवराज विद्यालयाने शिक्षणासाठी पालकत्व स्वीकारलं आहे. माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी याबाबतचं पत्र विद्यालयाला दिलं होतं.

****